# ।। तेजा चौधरी को संवाद ।।

## मारवाडी + मराठी

✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

## ।। तेजा चौधरी को संवाद ।।

।। साखी ।।

**सुण तेंजा सुखराम कहे,ओ मोसर मत चुक ।**
**जीती सार न हारिये,संसवो होयकर ढूक ।।१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज तेजा चौधरीला सांगतात की,तुला प्राप्त झालेला हा मनुष्य देहाचा अवसर चुकवू नकोस,हा मनुष्य देह प्राप्त होणे,हे जन्म मरणाच्या फेऱ्यातून निघण्याकरीता जिंकलेली बाजी आहे,त्याला हरुवू नकोस,याकरीता आता तु हिंमत कर व मजबुतीने राम भजन कर. ।।१।।

**सुन तेजा सुखराम कहे,डावन चुके बीर ।**
**ओ मोसर बेहे जावसी,ज्यूं सिलता को नीर ।।२।।**

भाऊ तेजा,हा जन्म मरणाच्या फेऱ्यातून निघण्याकरीता भारी अवसर(वेळ)मिळाला आहे. हा मनुष्य देहाचा डाव गमवू नकोस,जसे नदीचे पाणी वाहून चालले जाते ते परत फिरुन नदी मध्ये येत नाही,याचप्रकारे(अशाचप्रकारे)मनुष्य देहाचे जे श्वास जातात ते पुन्हा येत नाही.(परत येत नाही)अरे भाऊ तेजा,मनुष्य देह मिळाला व सतगुरु ही मिळाले, असा अवसर मिळणे दुर्लभ आहे,हा अवसर(वेळ)तुला मिळाला आहे.मनुष्य देह मिळाला परंतु जन्म मरण मिटवणारे जाणकार गुरु नाही मिळाले व अनाडी गुरु मिळाले तर अनाडी गुरु जीवाचे अकाज करुन देतात म्हणजे हंसाचे जन्म मरणाचा फेरा मिटवण्याचे काज (कारज)बिघडवून देतात.।।२।।

**सुण तेजा सुखराम केहे,गुरू सो बेद अजाण ।**
**बेरी की गरज साज सी,यूं कहे वेद कुराण ।।३।।**

गुरु आणि वैद्य अनाडी मिळाले तर शत्रुची गरजपूर्ती करतात.जसे वैद्य अनाडी असला तर जीवाचे अकाज करुन देतात,तसेच अज्ञानी गुरु मिळाला म्हणजे जन्म मरणाच्या फेरा मिटवणारा नाही मिळाला तर जीवाचे अकाज करतो असे हिंदुच्या वेदात आणि मुसलमानांच्या कुराणात सांगीतले आहे. ।।३।।

**नांव जडी सागे कणें,कळ किंमत नहीं काय ।**
**सुण तेजा सुखराम कहे,पाया रोग न जाय ।।४।।**

अनाडी वैद्याजवळ जडी खरी आहे परंतु वैद्याला जडी देण्याची कला,हिकमत माहीत नाही आहे तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज तेजाला सांगतात की,अशा वैद्याकडून जडी खाण्याने ही रोग जात नाही अशाच प्रकारे अनाडी गुरु जवळ नाव असली (खरे) आहे,परंतु नाम घेण्याची कला,हिकमत माहीत नाही तर त्या नामाने तिरण्याचा गुण शिष्यात प्रगटत नाही.जसे गुरु जवळ राम नाम आहे परंतु त्याला येत्या जात्या श्वासात

रामनाम घेण्याची विधि माहीत नाही तर शिष्याचा घटात निजनाम ने:अक्षर प्रगट होत नाही,ज्यामुळे शिष्याचे आवागमण मिटत नाही.।।४।।

झाडा औषध नांव रे,सुण सागे ही होय ।
जस बिन सुण सुखराम कहें,कारी लगे न कोय ।।५।।

झाडा,झपाटा,औषधी आणि नाम खरे आहे म्हणजे जसेच्या तसे आहे,परंतु झाडा, झपाटा,औषधी आणि नाम देण्याची हिकमत माहीत नाही तर अशा वैद्याकडून व गुरु कडून हंसाचे काम होत नाही. ।।५।।

झुठा गुरु के पासरे,झुठा शिष चल जाय ।
सुण तेजा सुखराम कहे,दोनु सुधन काय ।।६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज तेजाला सांगतात की,खोट्या गुरुजवळ अनाडी शिष्य गेला तर गुरु व शिष्य हे दोन्हीही धोखाच खातील. ।।६।।

सुण तेजा सुखराम कहे,समज सोच मन माय ।
अबके मोसर चुकीयां,जुग जुग परले जाय ।।७।।

याकरीता आदि सतगुरु सुखरामजी महाराज तेजा चौधरीला सांगतात की,समजून मनात विचार कर,हा या वेळेचा अवसर(वेळ)म्हणजे मनुष्य शरीर प्राप्त होऊन सतगुरु पण मिळणे,अशी वेळ चुकून गेल्यावर,युगायुगात प्रळयातच पडणे आहे.।।७।।

मोसर चुकां बात को,बोहों पिस्तावो होय ।
जन सुखदेव जी केत हे,सुणज्यो रे सब लोय ।।८।।

हा अवसर(ही वेळ)चुकून गेला तर,नतंर या गोष्टीचा खूप पश्चाताप होईल,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज तेजा चौधरी तसेच सर्व लोकांना हे ज्ञान ऐकून समजण्यास सांगतात. ।।८।।

कन फुंका गुरु हद का,भावे सो कर आय ।
सतगुरु बिन सुखराम के,सांसो कदे न जाय ।।९।।

हे कान फुंकणारे गुरु,सर्व हद्दीचे म्हणजे काळाच्या मुखातून न सोडवणारे आहेत,असे गुरु जरी शंभर गुरुही केले,तरीही सतगुरुच्या शिवाय काळ सुटण्याची चिंता कधी नाही जाणार.।।९।।

सदगुरु क्यूं कर जाणीये,आ पारख कहो मोय ।
ग्यानी तो सुखराम के,नाना बिध का होय ।।१०।।

तेजा चौधरी विचारतो आहे की,सतगुरु कसे ओळखावे,याची ओळख मला सांगा? आदि सतगुरु सुखरामजी महाराज तेजाला बोलले,संसारात ज्ञानी तर अनेक विधीचे आहेत. ।।१०।।

**आ सतगुरु की पारखा,सुणज्यो चित दे कान ।**
**केवल बिन सुखराम क्हे,भजे न दूजो जाण ।।११।।**

त्यांच्यात सतगुरुची पारख पुढील प्रकारची आहे,त्याला चित्त आणि कान देऊन ऐक,ते सतगुरु कैवल्याशिवाय दुसरे कोणते भजन करीत नाही. ।।११।।

**अनभे कागद लावीया,ब्रह्म देश सुं जाय ।**
**सो तारे सुखराम के,हँसा कुं जुग मांय ।।१२।।**

अणभे कागद म्हणजे सतगुरु पदवी म्हणजे जीवाला तारण्याचा परवाना,ज्यांनी सतस्वरुप ब्रह्मदेशातून आणला आहे,तेच जीवाला संसारातून म्हणजे भवसागरातून तारतील.।।१२।।

**कन फुँका की क्या चली,सागे सतगुरु होय ।**
**अनभे बिन सुखराम कहे,तार सके नहीं कोय ।।१३।।**

या कान फुंकणाऱ्या गुरुचे काय चालेल?आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सतगुरु ज्ञानात,सतगुरुसारखे ज्ञान परिपूर्ण ही असले तरीही ज्ञानी सतगुरुकडून हंस तिरत नाही,ज्यांना सतस्वरुपाचा ब्रम्ह देशात पोहचविण्याचा अनुभव आहे तेच हंसाला तारु शकतात,ज्यांना सतस्वरुपाचा त्या देशाला पोहचविण्याची कला माहित नाही,ते हंसाला तारु शकत नाही. ।।१३।।

**अनभे कागद हात दे,हर भेज्या जुग मांय ।**
**सो हंसा कुँ तारसी,सुखदेव कहे बजाय ।।१४।।**

ज्याचा हातामध्ये अणभे कागद म्हणजे हंस तारण्याची कला देऊन संसारातून हंसांना तारण्यास पाठवले आहे,तेच हंसांना तारतील,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सर्व हंसांना व तेजाला बजावून सांगीतले आहे. ।।१४।।

**जीण जन कुँ दुवो हुवे,हंस तारण को देख ।**
**ता संग सुखदेव उधरे,क्या गृही क्या भेक ।।१५।।**

ज्या संताला हंस तारण्याची परवानगी आहे म्हणजे बंकनाळेकडून उलटून गडावर चढण्याची विधी माहीत आहे अशा साधूच्या संगतने हंसाचा उद्धार होईल मग तो गुरु वैरागी असो किंवा ग्रहस्थी असो,जीव तारण्याच्या परवानगी असल्याशिवाय,कोणी हंसाला तारु शकत नाही,मग तो गुरु वैरागी असो किंवा ग्रहस्थी असो कसा का ही असेना,तो हंसाला तारु शकत नाही, ।।१५।।

**दुवा बिन सुखराम कहे,तार सके नहीं कोय ।**
**क्या गृही बेराग रे,भावे सो गुरू होय ।।१६।।**

हंस तारण्याच्या परवानगी शिवाय हंसाला मग तो गुरु ग्रहस्थी असो वा वैरागी असो कोणी तारु शकत नाही. ।।१६।।

जे जन तारन आवीया,दुवो ले जुग माय ।
वांसु मिल सुखराम कहे,नरका अेंक न जाय ।।१७।।

जे संत हंसांना तारण्याचा परवाना घेऊन,संसारात हंसांना तारण्याकरीता आले आहेत, ते संत मिळाल्यावर,त्या संतास मिळालेला हंस एकही नर्कात जाणार नाही. ।।१७।।

जे जन तारन आवीया,ज्यारा अे अेनान ।
सुखदेव मिलता प्रगटे,शिष मे साहेब आण ।।१८।।

जे संत हंसांना तारण्याकरीता आले आहेत,त्यांची ही निशाणी आहे,त्यांना,शिष्य जाऊन मिळताच शिष्यात साहेब येऊन प्रगट होतात.ही त्या संताची निशाणी आहे,।।१८।।

अणभे कागद बाहेरा,भावे सा जन होय ।
वा के संग सुखराम कहे,हंसो तिरे न कोय ।।१९।।

अणभे(जीवास तारण्याचा परवाना)राहील्याशिवाय कसाही संत असला,तरी ही त्याच्या संगतीने हंस तरणार नाही. ।।१९।।

ज्यूँ नर प्यादो सेरकों,यूँ अनभे बिन साध ।
सुखदेव सांच न मानीयो,सब मिथ्या हे बाद ।।२०।।

जसे बेलीफा हा एक प्रकारचा कोर्टाचा कर्मचारी असतो,त्याच्याजवळ जर समन्स किंवा वॉरन्ट नसला,तर त्याची गोष्ट कोणी मानीत नाही,तसेच अणभे म्हणजे हंस तारण्याचा परवाना शिवाय,जो साधु आहे त्यांच्या गोष्टी खोट्या समजुन,त्यांची गोष्ट सत्य मानु नका. ।।२०।।

परवाना बिन बाहेरो,प्यादो खेले घात ।
अनभे बिन सुखराम कहे,यूं शिष मिल्या न जात ।।२१।।

परवाना म्हणजे समन्स किंवा वॉरन्टचा शिवाय,बेलीफा त्याने कितीही डावपेच खेळले तरी त्याची गोष्ट मानू नका असेच अणभे म्हणजे हंस तारण्याच्या परवान्याशिवाय असे जे गुरु आहे,त्यांची गोष्ट मानु नका.अशा गुरुच्या जवळ शिष्य जाण्याने,तिरु शकत नाही. ।।२१।।

प्रवाणो ले आवीया,से जन जुग के मांय ।
सो ताकीदी देत हे,सुखदेव बोहो बिध आय ।।२२।।

परवाना घेऊन जे संत संसारात आले आहे,ते हंसांला अनेक प्रकारची समझ देतात व हंसांला भवसागरातून पार करतात.(करवतात) ।।२२।।।। इति तेजा चौधरी को संवाद सपूर्ण ।।